दिनांक २९.०७.२०२२

प्रेसनोट

**खाजगी इसम** :- श्री. शिवराज संतोष करळे, वय ३१ वर्षे, सध्या रा. २७/२ माईड हॉस्पीटल, आवली नगर सोलापूर मुळ रा. नालागांव ता. परांडा जि. उस्मानाबाद **यांच्यावर रु १०,०००/- ची लाचेची मागणी करुन पहीला हप्ता रु ४०००/- लाचेची मागणी करुन स्वतः स्विकारील्यावरुन गुन्हा दाखल.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | सोलापूर युनिट, पुणे परिक्षेत्र |
| गुन्हा नोंद क्रमांक | फौजदार चावडी पोलीस ठाणे सोलापूर शहर येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा कलम ७, ७ (अ) प्रमाणे |
| आरोपीचे नांव व कार्यालय | **खाजगी इसम** - शिवराज संतोष करळे, वय 31 वर्षे, रा. २७/२ माईड हॉस्पीटल, आवली नगर सोलापूर |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १०,०००/- रु लाचेची मागणी |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | दि. २८/०७/२०२२ रोजी पहीला हप्ता १०००/- रु फोन पे द्वारे व आज दि. २९/०७/२०२२ रोजी दुसरा हप्ता ४०००/- रु रोख स्वरुपात लाचेची रक्कम स्वतः स्विकारली |
| थोडक्यात माहिती | पडताळणी दि २९/०७/२०२२, रोजी<br>प्राप्त तक्रारीनुसार तक्रारदार याच्या चुलत बहीणीच्या मुलीस (चुलत भाची) बालगृह सोलापूर येथे ठेवण्यात आले असुन यातील खाजगी इसम करळे यांनी यापुर्वी बरीच वर्षे बालगृह सोलापुर येथे काम केले असल्याचे सांगुन सदर बालगृहातील अधिकारी कर्मचारी हे त्यांच्या ओळखीचे असल्याचे भासवुन सदर ओळखीचा वापर करुन तक्रारदार याना त्यांच्या चुलत भाचीची भेट घालुन देण्याकरीता खाजगी इसम शिवराज संतोष करळे, यांनी तक्रारदार यांचेकडे १०,०००/- रुपये लाचेची मागणी करुन त्यापैकी ५,०००/- रुपये यापुर्वी दि. २८/०७/२०२२ रोजी पहीला हप्ता म्हणुन फोन पे द्वारे स्विकारले असुन दुसरा हप्ता ४०००/- रुपये रोख स्वरुपात आज दि. २९/०७/२०२२ रोजी स्वतः स्विकारुन वैयक्तीक सांपत्तीक फायदा मिळवण्यासाठी गुन्हेगारी स्वरुपाचे वर्तन केले आहे.<br>यातील खाजगी इसम करळे यांना लाच मागणी करुन स्विकारलेवरुन दि. २९/०७/२०२२ रोजी रंगेहाथ पकडण्यात आलेले असुन त्यांना चौकशीकामी ताब्यात घेण्यात आले आहे. तरी गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे. |
| मार्गदर्शन अधिकारी | श्री. राजेश बनसोडे, पोलीस अधीक्षक लाप्रवि, पुणे<br>श्री. सुरज गुरव, अपर पोलीस अधीक्षक, लाप्रवि, पुणे |
| पर्यवेक्षण अधिकारी | श्री. संजीव पाटील, पोलीस उपअधीक्षक, लाप्रवि, सोलापूर |
| सापळा पथक | श्री. चंद्रकांत कोळी, पोलीस निरीक्षक, लाप्रवि, सोलापूर<br>पोलीस अंमलदार- पोह शिरीषकुमार सोनवणे, मपोना अर्चना स्वामी, पोशि प्रफुल्ल जानराव चापोशि सुरवसे सर्व नें. ॲन्टी करप्शन ब्युरो सोलापूर |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागा तर्फे सोलापूर जिल्हयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासबंधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकाबद्दल अथवा त्याच्यावतीने लाच मागणा-या खाजगी व्यक्तींबद्दल तक्रार असल्यास त्वरीत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे टोल फ्री क्रमांक १०६४ अगर दुरध्वनी क्रमांक ०२१७-२३१२६६८ वर संपर्क साधावा.

संपर्क पत्ता- पोलीस उपअधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, श्री छत्रपती शिवाजी रंगभवन चौक सोलापूर.

संकेतस्थळ - www.acbmaharashtra.gov.in

ई मेल - www.acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार ॲप – acbmaharashtra.net

व्हॉटस ॲप क्रमांक – ९९३०९९७७००

(चंद्रकांत कोळी)

पोलीस निरीक्षक

ॲन्टी करप्शन ब्युरो सोलापूर